पुण्यनगरी

# पान १ वरुन...

केले. निसर्गाचा लहरीपणा लक्षात घेता शेतकऱ्यांनी पिकविमा काढलेला होता, त्याचा फायदा आता शेतकऱ्यांना होत आहे. अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या पाच लाखांवर शेतकऱ्यांपैकी विमा काढलेल्या विमाधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत आहे.हंगामातील प्रतिकुल परिस्थितीअंतर्गत काढण्यात आलेल्या अधिसूचनेनूसार सोयाबिन पिकासाठी जिल्ह्यातील ७ महसुल मंडळामध्ये १८२९७ शेतकऱ्यांना ५.८४ कोटींची नुकसान भरपाई अदा करण्यात आलीविमा कंपनीने ८०७ शेतकऱ्यांना ३८.४६ लाख रूपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे. उर्वरीत ३६१६ शेतकऱ्यांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून नुकसान भरपाई निश्चीत करण्याचे काम सुरू आहे. ज्या विमाधारक शेतकऱ्यांनी नुकसानीची पूर्वसूचना दिलेली नव्हती, त्यांना हंगामाच्या पिक कापणी प्रयोगावर आधारीत महसुल मंडळाच्या किंवा तालुक्याच्या सरासरी उत्पन्नाच्या आधारे नुकसान भरपाई निश्चीत करण्यात येणार आहे.

## अखेर सावकारी...

ताब्यात घेतल्याचे श्रीमती तराळ यांनी सांगितले. या घरावरील बँक कर्जाचे हप्ते श्रीमती अबोली या नियमीतपणे भरतही आहे. सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याचेही त्यांनी सांगितले. सासरी कुणीही नाही, वडीलाचेही निधन झाले. अशा परिस्थितीत हतबल झालेल्या महिलेने सन २०१९ मध्ये भोकरदन येथील सहायक निबंधक कार्यालयात सावकारी प्रकरण दाखल केले. तत्कालीन सहायक निबंधक श्रीराम सोन्ने यांनी सर्व बाजू तपासून हे प्रकरण जिल्हा उपनिबंधकांकडे वर्ग केले. जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी साक्षीदाराचा जबाब, उलट तपासणीसह सर्व बाबी तपासल्यानंतर मौजे पद्मावती येथील गट नंबर १८२ मधील ९५ आर. शेतजमीनीचे खरेदी खत अवैध घोषीत करून सदर शेतजमीन अर्जदार मुळमालकाचे वारसदार म्हणून पत्नी अबोली संजय तराळ यांना परत करण्याचे आदेश दिले. या आदेशाआधारे सदर महिलेने सातबाऱ्यावर फेर घेतला असून जमीन परत मिळाल्याचा तिचा आनंद गगनात मावेसा झाला होता. परंतू यासाठी तिने घेतलेले कष्ट मोठे होते. याप्रकरणात अर्जदारातर्फे अ‍ॅड. दशरथ शिराळे यांनी काम पाहिले.


**हरवले आहे**

आकाश द्वारकादास पवार,
रा. कोळी सिरसगाव
ता. अंबड जि. जालना यांची
१० वी, १२ वी चे गुणपत्रक,
सनद प्रवासात हरवले आहे.
-: सापडल्यास संपर्क :-
9325743605

पुण्यनगरी

## रणरागिणीची जिद्द : पतीच्या निधनानंतर एकटीनेच दिला लढा

# अखेर सावकारी पाशातून सोडवली जमीन!

**जालना/प्रतिनिधी**

पतीच्या निधनानंतर घरात कुणीही कर्ताधर्ता नसताना एका महिलेने एकट्याने लढा देत सरकारी दप्तरी पाठपुरावा करीत सावकाराने अक्षरशः गिळंकृत केलेली ९५ आर. शेतजमीन परत मिळवण्यात यश मिळवले. जिल्हा उपनिबंधकांनी सदर जमीन सावकाराच्या विळख्यातून मुक्त करून मुळ मालकाच्या वारसास परत करण्याचे आदेश दिले. त्यानंतर या आदेशाआधारे सदर महिलेने तलाठ्यांकडे पाठपुरावा करून सदर जमीनीच्या सातबाऱ्यावर फेर घेतला.



मौजे पद्मावती येथील आपल्या शेतजमिनीसह श्रीमती अबोली तराळ.

फेरफारची नक्कल मिळाल्यानंतर सदर महिलेने जिल्हा उपनिबंधक कार्यालयात येवून सर्वांचे तोंड गोड करीत आनंद व्यक्त केला. जिल्हाधिकारी कार्यालयात हा रोमांचकारी क्षण पाहून उपस्थितांनी या लढवैय्या महिलेचे कौतुक केले.

याविषयी श्रीमती अबोली संजय तराळ यांनी सांगितलेली हकीकत अशी की, पद्मावती (ता. भोकरदन) येथे गट नंबर १८२ मध्ये स्व. संजय तराळ यांची वडीलोपार्जित ९५ आर जमीन आहे. सन २०१३ मध्ये स्व. तराळ यांनी पारध येथील सावकाराकडून चार लाख रूपये व्याजाने घेवून सदर जमीन गहाण ठेवली होती. पैशाची परतफेड झाल्यानंतर सदर जमीन परत करण्याच्या हमीवरच खरेदी खत करण्यात आले होते. कालांतराने संजय तराळ यांचा आजाराने मृत्यू झाल्याने त्यांच्या पत्नी अबोली तराळ यांनी एक मुलगी व मुलाचा सांभाळ करीत सदर सावकाराला साडे चार लाख रूपयांचा धनादेश देवून पतीचे कर्ज फेडले, परंतू सदर सावकाराने तडजोड करीत ५० लाख रूपये दिल्यानंतरच जमीन देईल, अशी भूमिका घेतली. याशिवाय औरंगाबाद येथील राहते घरही सदर सावकाराने पान/२

*शासनाने सावकाराकडे गहाण असलेल्या जमीनी मुळ मालकांना परत मिळवण्यासाठी कायदाच केला आहे, परंतू त्यासाठी आवश्यक पुरावेही गरजेचे आहे. सावकाराकडून पैसे घेवून जमीन गहाण ठेवल्यानंतर पैशांची परतफेड केली जाते, परंतू जमीनीचे स्वामीत्व मिळत नसल्याची अनेक प्रकरणे येतात. अशा प्रकरणांत कायदेशीर बाब तपासूनच खरेदी खत अवैध घोषीत करून जमीनी मुळ मालकांना परत करण्याचे आदेश पारीत केले जातात.*

**–नानासाहेब चव्हाण,** जिल्हा उपनिबंधक

*अडचणीच्यावेळी अनेक गरजू सावकारांकडे जमीनी गहाण ठेवतात. कालांतराने जमीनीचा मोल वाढल्यास सावकाराची नियत फिरते, अशावेळी जमीनधारकाची कायदेशीर बाबी तपासून त्यातील बारकावे लक्षात घेवून बाजू मांडली जाते. अबोली तराळ प्रकरणातही कायदेशीर बाबीचा अभ्यास करून बाजू मांडण्यात आली. त्यांना न्याय मिळाला, याचे समाधान आहे.*

**– अॅड. दशरथ शिराळे**